# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 10/07/2020 (शुक्रवार)
(दुपार)

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 07 कि.मी. अंतरावरील वाघोली शिवार येथे दिनांक 09/07/2020 चे 15:30 वा. पुर्वी हे फिर्यादी व त्यांचा चुलत भाऊ नामे– भृषण भुवनेश्वर कांडेकर(मृतक),वय 30 वर्षे ,रा. तेलंखेडी हे दोघेही त्यांच्या एमएच–40/डीएच–9219 क्रमांकाच्या होन्डा ॲक्टीवा मोपेड वर डबल सिट बसवुन कन्हान वरून तेलंखेडी गावाला जात होते. दरम्यान मनसर ते कन्हान मार्गावर समोरून येणाऱ्या एमएच– 40/बीवाय– 7156 क्रमांकाचा हिरो डिलक्सचा चालक आरोपी नामे– मुलचंद रामचंद वरकडे, वय 40 वर्ष, रा. बानोरा, ता मौदा याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मापेड गाडीला समोरा–समोर धडक दिली. या अपघातात दोघेही खाली पडल्याने फिर्यादीचा चुलत भाऊ भृषण कांडेकर हे गंभीर जखमी झाल्याने उपचार दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आशिष पुरनदास तांडेकर, वय 40 वर्ष, रा. तेलंगखेडी, कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा वरखडे 9637005303 हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावरील मौजा सावरगाव रोड येथे दिनांक 23/06/2020 चे 20:15 वा. दरम्यान आरोपी नामे– अशोक ठोंबरे याने त्याचे ताब्यातील लाईट नसलेला ॲटो क्र. एमएच–31/सीव्ही– 6410 हा नरखेड ते सावरगाव रस्त्याने हयगयीने व लापरवाहीने चालवुन पायदळ जात असलेल्या अनील धनराज रेवतकर(मृतक), वय 40 वर्ष, रा. सावरगाव यांना मागुन धडक दिली. त्यामुळे अनील रेवतकर यांच्या डोक्याला व डावे हाताला जबर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरद धनराज रेवतकर, वय 37 वर्ष, रा. सावरगाव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 105 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि अरून खुटेमाटे 9673803224 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर